महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
सीआयएन : यु४०१०९एमएच२०००५एसजीसी१५३६४५
दुरध्वनी क्र. २६४७४७५३ (वै)/२६४७४२११ (का)
फॅक्स क्र. २६४७२३६६
ईमेल : cecomm@mahadiscom.in
संकेतस्थळ : www.mahadiscom.in
प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व)
मुंबई- ४०० ०५१

**पीआर-३/सबसिडी/३८३३९** **दिनांक : २६/१२/२०१४**

## वाणिज्य परिपत्रक क्र. २३६

**विषय** :- महावितरण कंपनीच्या औद्योगिक ग्राहकांना डिसेंबर-२०१४ (नोव्हेंबर २०१४ मधील वीज वापरासाठीच्या) च्या वीज दरात सवलत देण्याबाबत.

**संदर्भ** :- १) शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१३/प्र.क्र.२७८ (भाग-१)/ऊर्जा-५, दि.२९.१.२०१४.
२) वाणिज्य परिपत्रक क्र. २१८ दि.१८.२.२०१४.
३) संकीर्ण-२०१३/प्र.क्र.२७८ (भाग-२)/ऊर्जा-५ दि.२९.३.२०१४
४) शासन निर्णय क्र.संकिर्ण- २०१३/प्र.क्र.२७८ (भाग-३)/ऊर्जा-५, दि.२२.१२.२०१४.
५) शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१४/प्र.क्र.७० (शिकाना)/ऊर्जा-५, दि.२२.१२.२०१४.

मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या सप्टेंबर -२०१३ च्या आदेशामुळे घरगुती (० ते ३०० युनीटपर्यंत), औद्योगिक व कृषी ग्राहकांच्या वीज दरात वाढ झाली. शासनाने शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१३/प्र.क्र.२७८ (भाग-१)/ऊर्जा-५, दि.२९.१.२०१४ नुसार वरील ग्राहकांना दिलासा देण्याकरिता सवलतीचे वीज दर लागू केले. सदर सवलतीपोटी महावितरण कंपनीस शासनाकडून फेब्रुवारी २०१४ पासून अनुदान देण्यात येत होते. शासन निर्णयाच्या अनुषंगाने सवलतीचे दर लागू करण्याबाबत वाणिज्य परिपत्रक क्र.२१८ दि.१८.२.२०१४ अन्वये सर्व क्षेत्रिय कार्यालयांना निर्देशित करण्यात आले होते.

शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१३/प्र.क्र.२७८ (भाग-३)/ऊर्जा-५, दि.२२.१२.२०१४ नुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

शासन निर्णय संदर्भ क्र. १ व ४ (उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, संकीर्ण-२०१३/प्र.क्र.२७८ (भाग-१)/ऊर्जा-५ दि.२९.१.२०१४ व संकीर्ण-२०१३/प्र.क्र.२७८ (भाग-२)/ऊर्जा-५ दि.२९.३.२०१४) अन्वये वीज दरात देण्यात येत असलेली सवलत कृषी ग्राहकांव्यतिरिक्त इतर ग्राहकांसाठी डिसेंबर २०१४ पासून रद्द करण्यात येत आहे.

या अनुषंगाने शासनाने महावितरण कंपनीस वीजदराचे सवलतीपोटी देण्यात येणारे रु.७०६/- कोटी प्रतिमाह अनुदान दि.०१.१२.२०१४ पासून देण्याचे बंद केले. परिणामी औद्योगिक वर्गवारीतील ग्राहकांना माहे नोव्हेंबर २०१४ मधील वीज वापरासाठीची डिसेंबर २०१४ मध्ये देण्यात आलेली सवलत रद्द करण्यात आल्याने वीज देयकामध्ये वाढ झाली.

सदर दरवाढ अचानकपणे लागू करण्यात आल्याने पुढील कालावधीत होणा-या वीज दरवाढीचे योग्य नियोजन करण्याच्या दृष्टीने शासनातर्फे शासन निर्णय संदर्भ क्र.५ (संकिर्ण-२०१४/प्र.क्र.७० (शिकाना)/ऊर्जा-५, दि.२२.१२.२०१४) अन्वये शासन निर्णय संदर्भ क्र. १ नुसार देण्यात आलेली सवलत महावितरण कंपनीच्या औद्योगिक ग्राहकांना एका महिन्यासाठी म्हणजेच डिसेंबर २०१४ (नोव्हेंबर २०१४ मधील वीज वापरासाठीच्या वीज देयकाकरीता) करिता लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

शासनाच्या संदर्भ क्र.५ मधील शासन निर्णयान्वये सर्व क्षेत्रिय कार्यालयांना कळविण्यात येते की, औद्योगिक ग्राहकांच्या डिसेंबर २०१४ मध्ये देण्यात आलेल्या (नोव्हेंबर २०१४ मधील वीज वापरासाठीच्या) वीज देयकाची आकारणी संदर्भिय शासन निर्णय क्र. १ व वाणिज्य परिपत्रक क्र. २१८ दि.१८.२.२०१४ व २२१ दि.१५.०३.२०१४नुसार करण्यात यावी. डिसेंबर-२०१४ चे वीज बिल यापुर्वीच निर्गमित झालेले असल्यास सदर सवलत पुढील वीज बिलात समायोजित करण्यात यावी.

शासन आदेशाप्रमाणे माहे डिसेंबर-२०१४ करिता औद्योगिक ग्राहकांच्या वीज बिलांची आकारणी सवलतीच्या दरात करण्यात आल्यावर शासनावर पडणा-या आर्थिक भाराच्या रकमेची परिगणना माहिती व तंत्रज्ञान विभागाने करावी जेणेकरुन शासनाकडे प्रतिपूर्तीच्या रकमेच्या पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव पाठविण्यात येईल.

मुख्य अभियंता (वाणिज्य)

**प्रत सस्नेह रवाना :-**

मुख्य महाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान), महावितरण, मुंबई.

-- आपणास कळविण्यात येते की, वरील विषया संदर्भात औद्योगिक ग्राहकांची माहे डिसेंबर-२०१४(नोव्हेंबर२०१४ मधील वीज वापराची) ची वीज बिले सवलतीच्या दराने आकारल्यानंतर वितरण कंपनीवर पडणा-या आर्थिक भाराची परिमंडळ व ग्राहक संख्यानिहाय माहिती त्वरीत पाठविण्यात यावी. जेणेकरुन शासनाकडून आर्थिक पूर्तत: करण्याकरीता प्रस्ताव पाठविण्यास मदत होईल.

**प्रत रवाना :- प्रेषण यादीप्रमाणे**